# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/११/२०१६

**१) बोलेरो गाडीच्या चालकाच्या लापरवाहीने, एकाचा मृत्यु . :–**

दिनांक ४/११/२०१६ रोजी ०७.४० वा. दर. फिर्यादी यादव यादव नरसैया तुरईवार वय ४३ वर्ष, रा. सावरबंध यांचा मुलगा प्रशांत तुरईवार वय २० वर्ष हा आपल्या मोटार सायकलने ट्रॅक्टर चालकास बोलावुन घराकडे येत असता सानगडी कडुन जाणा–या बोलोरो काळया रंगाच्या प्रवाशी गाडीच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन अती वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन प्रशांत तुरईवार यांच्या नवीन मोटार सायकलला समोरून धडक मारून गंभीर दुखापत करून त्याचे मरणास कारणीभुत होवुन पळुन गेल्याने फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४/१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गांवडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील फिर्यादी मधुकर अंताराम पाहुलझगडे वय ५१ वर्ष रा. तकीया वार्ड भंडारा यांनी आपली मोटार सायकल क्र. एमएच.३६ आर ९२२३ कि.८०,०००/रू ची काळया रंगाची पॅशन प्रो. हि सनी प्लाझा एसटी. स्टॅन्ड जवळ भंडारा येथे ठेवुन सामान खरेदी करण्याकरीता गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोस्टे स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. .

**३) खुल्या दारातुन आत प्रवेश करुन लोखंडी आलमारीतुन नगदी पैश्याची चोरी. :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी १३.०० वा. ते १४.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश प्रितीलाल मेश्राम वय ४७ वर्ष रा.नेहरू वार्ड वरठी लग्न समारंभामधे कामठी खैरी येथे गेला असता घरी फिर्यादीच्या २ मुली हजर असतांना तो महत्वाच्या कामाने घरा शेजारी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने खुल्या दारातुन आत प्रवेश करून लोखंडी आलमारीतुन ४,०००/रू चोरून नेल्याने घरा शेजारच्या सर्व सदस्याची विचारपुस व शहनीशा करून फिर्यादीने आज रोजी पोलीस स्टेशनला तक्रार दिल्याने पोस्टे स्टेशन वरठी येथे कलम ३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. .

**४) क्षुल्लक कारणाने भांडण करुन स्टीलच्या वस्त्राने मारुन जखमी केले. :–**

दिनांक ०४/११/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी रोषन महादेव गिरडकर वय २४ वर्ष रा. सिंधपुरी हा दाढी करण्यास सलुन मध्ये बसला असता आरोपी हा त्या ठिकाणी येवुन तु खुर्चीवरून उठ मला चेह–यावर पाणी मारायचे आहे असे बोलुन उठवले असता फिर्यादीने आरोपीस माझा दाढी करण्याचा नंबर आहे 'तु कशाला ढकलतोस' असे बोलेले असता यातील आरोपीने भांडण करून सलुन मध्ये ठेवलेल्या दाढी करण्याच्या स्टीलच्या वस्त्राने नाकावर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा लिल्लारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. .

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, लाखनी, पवनी, व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन १३६ लिटर हातभट्टी दारु + १ मोटार सायकल कि. ४९,९००/–रु. चा तसेच ४ लिटर ८६० मिली देशी कि. १,३५० /–रु. असा एकुण कि. ५१,२५० माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.